**आर बी आय/२००४/२२७**

यु बी डी क्र. युबीडी. बीपीडी. पीसीबी. परिपत्रक ४८/०९.१६१.००/२००३-०४ मे २९ २००४

सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकाचे मुख्य अधिकारी,

प्रिय महोदय,

**''तुमच्या ग्राहकाला ओळखा'' मार्गदर्शक तत्वे - अनुपालन**

कृपया आमचे परिपत्रक, युबीडी. क्र. डीएस.पीसीबी-सीआयआर १७/१३.०१.००/२००२ -०३ दिनांक सप्टेंबर १८, २००२ चा संदर्भ घ्यावा. त्यात ग्राहकाने खाते उघडताना, नागरी सहकारी बँकांनी ''तुमच्या ग्राहकाला ओळखा'' संबंधी पाळावयाची मार्गदर्शक तत्वे दिली होती. या आवश्यकतांचे अनुपालन करताना युसीबीज इतर वैयक्तिक माहितीही गोळा करतात.

२) श्री.एस.एस. तारापोर अध्यक्ष असलेल्या, ''प्रोसिजर्स अँड परफ़ॉरमन्सेस ऑडिट ऑन पब्लिक सर्व्हिसेस'' वरील समितीच्या नजरेस आले आहे की, ग्राहकांबद्दल मिळवलेल्या माहितीचा उपयोग,बँकांद्वारे इतर सेवा/बाबींची विक्री करण्यासाठी केला जात आहे. कधी-कधी अशी माहिती इतर एजन्सीजनाही दिली जात असते. ग्राहकाने खाते उघडण्यासाठी, केवायसीच्या अनुपालनासाठी दिलेली माहिती ही गोपनीय असून, ती माहिती इतरांजवळ अन्य बाबी/सेवा विक्रीसाठी उघड करणे हा ग्राहकाने दाखवलेल्या विश्वासाचा भंग आहे. यासाठी, नागरी सहकारी बँकांना कळवण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या शाखांना, त्यांनी त्यांच्या ग्राहकांशी असलेल्या उत्तरदायित्वाचे अनुपालन याबाबतीत कठोरतेने करण्यासाठी निदेश द्यावेत.

३)केवायसी- आवश्यकता सोडून इतर हेतूसाठी एखाद्या ग्राहकाची माहिती बँकांना मिळवायची असल्यास, तो खाते उघडण्याच्या फ़ॉर्मचा एक भाग असू नये. अशी माहिती, ती माहिती कशासाठी हवी आहे हे ग्राहकांना समजावून व त्या माहितीचा बँक नेमका काय उपयोग करणार आहे यासाठी ग्राहकाची स्वेच्छेने परवानगी घेऊन मिळवण्यात यावी.

४) बँकाना कळविण्यात येते की त्यांनी याबाबतच्या सध्याच्या रीती त्यांच्या मंडळ/ प्रशासनकर्ता याजकडून तपासून घ्याव्यात व त्यांच्या शाखांना योग्य त्या सूचना देऊन त्यांचे अनुपालन करण्यास सांगावे.

५) या परिपत्रकाची पोच कृपया आमच्या प्रादेशिक कार्यालयाकडे द्यावी.

आपला विश्वासू,

(के.करुप्पसामी)

प्रभारी, मुख्य महाव्यवस्थापक